REVIEW OF RESEARCH

# शिस्त व अपील /वर्तणूक नियम
# म्हातारी मेल्याच दु:ख नाही, पण काळ सोकावण्यावर अटकाव

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019

डॉ. तुषार निकाळजे




**प्रस्तावना :—**

नुकतीच एका विद्यापीठाच्या अधिका—याच्या नियुक्तीबाबत आक्षेप घेणारी बातमी वाचली. त्यावर सामाजिक कार्यकर्ते, प्रसार माध्यमे यांनी नाराजी व्यक्त केली. या अधिका—याच्या सेवेत नेमणूकीला आज १६ वर्षांनी आक्षेप घेतला गेला, यापेक्षा नेमणूकीपासून आजपर्यंत व्यवस्थांनी डोळेझाक कशी केली ? हा प्रश्न उपस्थित राहातो. या १६ वर्षांमध्ये या अधिका—याच्या नियुक्ती, पदोन्नती, वेतनवाढी, परिविक्षा कालावधी, विविध अधिकारी व अधिकार मंडळे यांचे अधिकार, नागरी सेवा नियम यांची चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणातील आक्षेप “कक्षाधिकारी” पदाच्या नियुक्तीच्यावेळी असलेल्या वयोमर्यादेबाबतचा तसेच शैक्षणिक पात्रता, अनुभवासंबंधी आहे. नियुक्तीच्यावेळी वय १५ दिवसांनी कमी होते. त्यामुळे हा आक्षेप घेतला गेला. हे कक्षाधिकारी नंतर सहाय्यक कुलसचिव व उपकुलसचिव पदावर पदोन्नतीने काम करीत आहेत.

**१) पदभरती करीता जाहिरात :—** शासन नियमानुसार कोणतीही पदभरती करताना सुरुवातीस उच्च शिक्षण संचालकांमार्फत जाहीरात मंजूर करुन घ्यावी लागते. त्याकरिता पदनाम, वेतनश्रेणी, शैक्षणिक/तांत्रिक अर्हता, वयोमर्यादा (जातीनिहाय प्रवर्गासाठी शिथील) यांचा उल्लेख करणे आवश्यक असते. तदनंतर वर्तमानपत्र, इंटरनेट, समाजकल्याण कार्यालयांमार्फत अर्ज मागविले जातात.

**२) अर्जांची छाननी :—** प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करावी लागते. सदरचे काम छाननी समितीमार्फत करावे लागते. ब—याच वेळा विद्यापीठातील छाननी समितीमध्ये प्रशासन विभागाचे उपकुलसचिव, कायदा अधिकारी, इतर विभागातील प्रशासकीय अधिकारी असतात. जर एखादा अर्जदार वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुभव नसल्यास त्याचा अर्ज बाद केला जातो. या लेखातील प्रकरणात अशी कृती झालेली दिसत नाही. यास त्यावेळी असलेल्या उपकुलसचिवांचा (प्रशासन) हलगर्जिपणा की हेतूपूरस्पर दुर्लक्ष म्हणावे ? अन्यथा हे प्रकरण आजच्या परिस्थितीपर्यंत पोहोचले नसते.

**३) उपकुलसचिव प्रशासन यांचे कार्यालयीन चारित्र्य :—** वरील क्रं. २ मधील हलगर्जीपणा किंवा दुर्लक्षितपणाचे जास्त अभ्यास करावयाचा असल्यास त्यावेळच्या उपकुलसचिव (प्रशासन) यांच्या कार्यालयीन चारित्र्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. या उपकुलसचिवांची २००८मध्ये प्रशासन ते नियोजन व विकास कार्यालयातील बदली का ? बदली होण्यापूर्वी ३० दिवस सक्तीच्या रजेवर होते का ? यासंदर्भात तत्कालीन कुलसचिवांनी तत्कालीन कुलगुरुंना या उपकुल सचिवां सदर्भात एखादी टिपण्णी

LBP PUBLICATION

(फाईल) सादर केली होती का ? या टिपण्णीतील मजकूरात "कार्यालयीन कामकाजात गलथानपणा, पदाचा गैरवापर, आर्थिक किंवा कार्यालयात महिलेशी गैरवर्तन केल्याबाबत तक्रार होती का ?" तद्नंतर यांची परीक्षा विभागातील परीक्षा नियंत्रक पदावर (व्यूहरचना करुन झालेली) नियुक्ती व एकाच वर्षात प्रकृती स्वास्थामुळे पुन्हा पदावनती (Reversion) का घेतली ? किंवा त्यांच्या कार्यकाळात अवैध गुणवाढ प्रकरणे, लेजरच्या गुणांची पृष्ठे बदलणे, परदेशी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे इत्यादी प्रकरणांच्या चौकशी समितीमुळे ही प्रकृती स्वास्थ्याच्या नावाखाली पदावनती (Reversion) घेतली? नंतर पुन्हा प्रकृती ठणठणीत/सुधारणा झाल्याने वेगवेगळया समित्यांवर काम कसे करु शकतात? त्याचे वेगवेगळे आर्थिक मानधन किंवा परगावी प्रवास करताना त्यांची प्रकृती ढासळत नाही का ? अशा या उपकुलसचिवांना गुणवंत /आदर्श अधिकारी पुरस्कार कसा दिला जातो ? त्यांच्या या पुरस्कारावर आक्षेपही आलेला असताना, या अधिका—यावर कार्यालयीन स्वरुपाची फौजदारी याचिका न्यायालयात प्रलंबित असताना प्रशासन परदेशी जाण्यास परवानगी कसे देते ? या अधिका—याच्या सेवानिवृत्तीपूर्वी सहसंचालक (उच्च शिक्षण) किंवा कुलगुरु यांचेकडे आलेल्या तक्रार अर्जाकडे दुर्लक्ष का केले जाते ? किंवा सेवानिवृत्तीस अडथळा येवू नये म्हणून क्लिन चिट समजावी. काही वेळा सेवानिवृत्तीचे आर्थिक फायदे सेवानिवृत्तीच्या अगोदर मिळावे असे विनंती अर्ज केले जातात. तसा अर्ज या उपकुलसचिवाने केला आहे का ? या सर्व प्रश्नांची तपासणी केल्यास या उपकुलसचिव महोदयांचे कार्यालयीन चारित्र्य लक्षात येईल. सौ चुवे खाकर ..... असा प्रकार असावा.

**४) विद्यापीठ आरक्षण विभाग :—** कोणतीही भरती किंवा पदोन्नती प्रक्रिया राबविताना आरक्षण विभागाकडून बिंदूनामावली (रोस्टर) तपासून घेतली जाते. या प्रकरणात आरक्षण विभागाची भूमिका काय ?

**५) मागासवर्गीय कक्ष (राज्य) :—** वरील क्रं. ४ मधील मागासवर्गीय कक्ष तपासत असते.

**६) सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग :—** सेवेतील नेमणूक, पदोन्नती, शासकीय आर्थिक लाभ, सेवानिवृत्ती, पेन्शन इत्यादी कामांची तपासणी सहसंचालक (उच्च शिक्षण) करीत असते. या लेखातील अपात्र कक्षाधिका—यास सहाय्यक कुलसचिव, उपकुलसचिव अशा दोन पदोन्नत्या दिल्या गेल्या. त्यांची तपासणी करताना सहसंचालक कार्यालयास अपात्रतेच्या बाबी लक्षात आल्या नाहीत का ?
सहसंचालकांना व्यवस्थापन परिषदेचे सदस्यत्व असते. गेल्या १५ वर्षात किमान १४० व्यवस्थापन परिषदेच्या बैठका झाल्या असाव्यात. त्यामध्ये त्यांनी हा प्रकार उघडकिस का आणला नाही ? सहसंचालक शासनाचे विश्वस्त असतात. शासनाचे नियम व बाजू स्पष्टपणे मांडणे आवश्यक असताना हा प्रकार कसा घडू शकतो ?

**७) विद्यापीठ पदोन्नती समिती :—** कर्मचारी व अधिका—यांच्या बढत्या (पदोन्नती) करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर पदोन्नती समिती असते. या समितीने या प्रकरणातील अपात्र कक्षाधिका—यास सहाय्यक कुलसचिव, उपकुलसचिव या पदांवर पदोन्नती देताना कोणते निकष पाहिले ?

**८) इतर क्षमापित प्रकरणे :— २००८** साली नोकर भरती घोटाळा झाला होता. त्यामध्ये दोन अधिका—यांना दिड वर्षे निलंबित केले, परीक्षा विभागातील एका अधिका—याने व कर्मचा—याने एका विद्यार्थ्यांचे गुणांत अवैध गुणवाढ (अधिकारी सहीसलामत सेवानिवृत्त कर्मचारी अद्याप कार्यरत), पुनर्मूल्यांनामध्ये अवैध गुणवाढ प्रकरणी तीन कर्मचा—यांना निलंबित (पोलिस, न्यायालयात प्रकरण), पुन्हा शासकीय सेवेऐवजी विद्यापीठ निधीतून समाविष्ट, लेजरची पृष्ठे बदलणारा सेवक, बोगस महाविदयालय प्रकरणातील कुलगुरुंचे सहाय्यक कुलसचिव इत्यादी बरीच प्रकरणे घडली, काहींचे अहवाल गुदस्त्यात ठेवले, राहिले, गायब झाले, तर काहींना "क्षमापित" करुन सेवेत समाविष्ट करुन घेतले गेले.

**९) या प्रकरणातील अपात्र उपकुलसचिव (मूळचा अपात्र कक्षाधिकारी) यांची कार्यप्रणाली :—** हे उपकुलसचिव प्रशासन विभागात कार्यरत असल्याने आधिका—यांच्या पदोन्नत्या वेळच्यावेळी होण्याची दक्षता बाळगणारे, परंतु कर्मचा—यांच्या पदोन्नत्या दिड—दोन वर्षे प्रलंबित ठेवणारे. या प्रकारामुळे गेल्या पंधरा वर्षांच्या कालावधीत किमान ७९ कर्मचा—यांचे रु. ५४ लाख रुपये नुकसान झाले असावे. या ७९ पैकी १८ जण सेवानिवृत्त तर सहा जण दिवंगत झालेले. हे नुकसान कोण भरुन देणार ? सध्या एक चर्चा चालू आहे. एक पदवीप्रदान समारंभ राज्यापालांची परवानगी न घेतल्याने रदद् झाला. त्याचे रु. ११ लाखांचे नुकसान झाले. त्यावर समिती नेमली आहे. मग या ७९ कर्मचा—यांच्या रु. ५४ लाख नुकसान भरपाईवर समिती का नेमली नाही ? एका न्यायालयीन प्रकरणांत या अपात्र उपकुलसचिवास विद्यापीठामार्फत साक्षीदार म्हणून नेमले. या प्रकरणाकरिता चार वकिलाच्या फीचा खर्च अंदाजे ७ लाख (आजपर्यत) दिला गेला. त्या केसचा निकालही लागला. परंतु आता विचार आला, हा विद्यापीठाचा साक्षीदार अपात्र अधिकारी असल्याने पुन्हा फेरविचार/उजळणी याचिका दाखल होते की काय ?

**१०) कुलसचिवांचा नैसर्गिक न्याय :—** “या अपात्र अधिका—याला क्षमापित करुन व्यवस्थापन परिषदेने नैसर्गिक न्याय दिला” असे भाष्य कुलसचिवांनी केले. नैसर्गिक न्याय कोणाला दिला जातो ? ज्याची नैतिकता चांगली आहे. या अपात्र अधिका—याने विद्यापीठाची/शासनाची फसवणूक केली. याला नैतिकता म्हणावी का ? कुलसचिव परदेशात दौरे करुन आले आहेत. ते स्वत:ला व्यवस्थापन गुरु समजतात. युनायटेड स्टेटस्च्या मा. सर्वोच्च न्यायालयाने नैसर्गिक न्याय संदर्भात नोंदविलेले मत (लॉरेन्स विरुध्द टेक्सास) (जॉन फिनीस) माहित कसे नाही. तसेच भारतीय संविधानातील तरतूदी माहिती नाहीत का ? ज्या कुलसचिवांनी निवडणूक कामात अडथळा आणल्या प्रकरणी दिनांक २७/०३/२०१९ रोजी (मानवी हक्कांची पायमल्ली, महिलांचा कार्यालयीन कामकाजातील छळ इत्यादी ) कुलगुरुंकडे तक्रार अर्ज जातात, व्यवस्थापन परिषदेने दिनांक ३१/०१/२०१८ रोजी मंजूर केलेल्या कर्मचा—यांच्या हिताच्या ठरावाची अमंलबजावणी आजपर्यत होत नसेल, तर अशा कुलसचिवांनी नैसर्गिक न्यायाची भाषा करणे किती योग्य ? या अपात्र कुलसचिवांच्या अपात्रतेविषयी वर्ष २०१५ मध्ये कुलगुरुंकडे एक तक्रार अर्ज आला होता. सदर तक्रार अर्ज कायदेशीर बाबी तपासण्यासाठी वरिष्ठ कायदा अधिका—यांकडे वर्ग केला. परंतु त्यावर आजपर्यत कोणतीही कार्यवाही का नाही ? कदाचित वरिष्ठ कायदा अधिकारी व उपकुलसचिव हे अधिकारी गटातील (लॉबी) किंवा इतर कोणते साटेलोटे, प्रशासकीय हितसंबंध हा एक संशोधनाचा विषय होईल. दिनांक १५ सप्टेंबर १९५२ च्या शासन निर्णयानुसार प्रत्येक कर्मचा—याने भारतीय संविधानाची निष्ठा बाळगण्याची शपथ घेण्याविषयी तरतूद आहे. या अपात्र अधिका—याने एक प्रकारे भारतीय संविधानाचा अवमान केला आहे, तो क्षमापित करण्यास पात्र आहे का ?

**११) तर शैक्षणिक पात्रता विभाग बंद करावा लागेल :—** विद्यापीठाच्या प्रशासकीय अधिका—याची शैक्षणिक, अनुभव, अर्हता, वयोमर्यादेची पात्रता क्षमापित झाल्यास भविष्यात विद्यार्थी देखील त्यांच्या शैक्षणिक पात्रतेचे निकष क्षमापित करण्याची मागणी करतील. विद्यापीठाअंतर्गत वेगवेगळे १२३ अभ्यासक्रम शिकविले जातात. त्यांची शैक्षणिक पात्रता वेगवेगळी असते. दरवर्षी २ लाख ७० हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक पात्रतेच्या निकषानुसार प्रवेश व परीक्षा देण्याची परवानगी दिली जाते. या २ लाख ७० हजार विद्यार्थ्यांपैकी किमान ०५% विद्यार्थ्यांनी शैक्षणिक पात्रता क्षमापित करण्याची विनंती केल्यास ? कदाचित भविष्यात कालांतराने शैक्षणिक पात्रता विभागच बंद करावा लागेल. अशी शंकाही निर्माण होते.

**१२) कुलगुरु, कुलसचिवांची प्रशासकीय भूमिका :—** ऑक्टोंबर २०१७ साली विद्यापीठ कार्यप्रणालीत बदल आणण्यासाठी कर्मचा—याने दिलेले प्रस्ताव अद्याप प्रलंबित, याबाबत कर्मचा—याने भेटीसाठी मागणी करुनही भेटीची वेन न देणे, व्यवस्थापन परिषदेपुढे असे प्रस्ताव न ठेवणे, कामगार संघटनेच्या पदाधिका—याच्या पुस्तक प्रकाशनाला वेळ देणे, दिवाळी अंक , मासिके यांच्या प्रकाशन समारंभाला वेळ देणे, अधिसभा सदस्यांनी विद्यार्थ्यांना कुलगुरुंनी वेळ न देण्याबाबत व्यक्त केलेली नाराजी, काही

विद्यापीठ अधिका—यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांचे उल्लंघन करुन पदव्या प्राप्त करणे, याबाबतच्या तक्रारींवर कारवाई करण्याची नाकर्तेपणाची भूमिका, परदेशी दौरे, प्रशासनाला डोईजड झालेल्या कर्मचा—यांच्या परजिल्हयात (प्रशासकीय सोयीकरिता) बदल्या करणे, त्यांचे संसार विस्कळीत कसे होतील ?, आणि या अपात्र अधिका—याच्या पात्रतेचे क्षमापित प्रकरण इत्यादींचे संशोधन केल्यास कुलसचिव, कुलगुरु यांच्या प्रशासकीय भूमिकेचे वेगळेच चित्र समोर येईल.

**१३) उपकुलसचिव अपात्र ही त्यांची चूक की इतर व्यवस्थेचे अपयश ? याचा विचार व्हावा :—**

अधिकार मंडळाने क्षमापित केलेल्या आजपर्यंतच्या कर्मचारी, अधिका—यांच्या चुका म्हणजे, “त्याच कुणी काय करेल ? म्हणून माझं करणार आहे,” अशी प्रवृत्ती फोफावली आहे.याकरीताच शिस्त, अपील, वर्तणूकीसारखे नियम केले आहेत. म्हातारी मेल्याच दु:ख नाही, परंतु काळ सोकावू नये म्हणून अशा प्रश्नांवर कठोर कारवाई करणे योग्य होईल असे वाटते.

**संदर्भ :—**

१) उपकुलसचिवांवर कारवाई करण्यास “खो” :— दै. लोकमत दिनांक ०४ मे २०१९ पृष्ठ ७,
२) http://karmalamadhanews24.com / ? P = 5372, कुलगुरु व कुलसचिवांकडून सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचा अवमान.
३) कुलसचिवांच्या तक्रारीवर अहवाल मागविला :— दै. लोकमत दिनांक ७ मे २०१९ पृष्ठ २
४) कुलगुरुंना दि. २७/०३/२०१९ रोजी दिलेला अर्ज,
५) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९,
६) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६,
७) पुणे जिल्हा न्यायालय स्पे. मु. क्रं. ३५४/२०१२ (दिवानी दावा),
८) मुंबई उच्च न्यायालय फौजदारी याचिका क्रं. १६८१/२०१६,
९) मुंबई उच्च न्यायालय दिवाणी याचिका क्रं. ७६०४/२०१६,
१०) माहिती अधिकारी कार्यालय यांचे संदर्भ मा.अ./२०१३/१२, दि. ०२/०१/२०१३,
११) प्रा. गोडेबोले समिती अहवाल वर्ष २००८—२००९,
१२) माहिती अधिकारी कार्यालय यांचे संदर्भ मा.अ./२०१३/१३८, दि. १७/०१/२०१३,
१३) माहिती अधिकारी कार्यालय यांचे संदर्भ मा.अ/२०१३/४३६, दि. २६/०२/२०१३,
१४) माहिती अधिकारी कार्यालय यांचे संदर्भ मा.अ/एम.आर.एस./२५२२, दि. ३०/११/२०११,
१५) विद्यापीठाने घेतले दोषी कर्मचा—यांना पुन्हा सेवेत:— दै. पुढारी दि. १४ मे २०१७,
१६) अधिसभेत होवू शकतो राजकीय हस्तक्षेप :— दै. लोकमत दि. ३० नोव्हें. २०१७, पृष्ठ ८,
१७) डुप्लीकेट गुणपत्रिका पडली महागात :— दै. सकाळ दि. १८ जाने. २०१२, पृष्ठ ४,
१८) विद्यापीठ भ्रष्टाचाराचे कुरण :— मासिक साप्ताहिक चपराक, डिसेंबर २०१७, पृष्ठ १४,
१९) पुनर्मूल्याकंन प्रकरणी आणखी मासे गळाला : दै. सकाळा दि. १७ डिसें., २०१२, पृष्ठ ३,
२०) व्यवस्थापन परिषद ठराव क्रं. ४९, दि. ३१/०१/२०१८,
२१) पदवी प्रदान समारंभ अचानक स्थगित:— दै. सकाळ दि. १० मे २०१७, पृष्ठ ४,
२२) तत्कालीन पॉलिटिकल व सोशल डिपार्टमेंटच्या क्रं. १६४२/४६, दि.१४ सप्टें.१९५२ चा निर्णय,
२३) सामान्य प्रशासन (महाराष्ट्र शासन) निर्णय—सीडीआर—१०९३/१०७७/सीआर—२३/९३/११, दि. १२ ऑक्टों. १९९३.



**डॉ. तुषार निकाळजे**